Approved by VC
26/6/12

क्र.काप्रावि/आयसीडी/२०१५.१६/

क्र.२/२०१५- २०१६

गोपनीय
व्यवस्थापन परिषद

# मुंबई विद्यापीठ

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सभा **मंगळवार, *दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजी दुपारी ४.३०*** वाजता सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई -४०० ०३२, येथे संपन्न झाली. सभेमध्ये खाली नमूद केल्याप्रमाणे सदस्य उपस्थित होते :-

१. डॉ. राजन वेळूकर (कुलगुरू)
२. प्राचार्य (डॉ.) नरेश चंद्र (प्र-कुलगुरू)
३. प्राचार्य (डॉ.) सुरेश किसनराव उकरंडे
४. डॉ. प्रल्हाद जी. जोगदंड
५. प्राचार्य (डॉ.) राजपाल एस. हांडे (संचालक, बी.सी.यु.डी.)
६. प्राचार्य (डॉ.) दत्ताजीराव यशवंतराव पाटील
७. प्राचार्य (डॉ.) गोरक्ष विठ्ठलराव पारगांवकर
८. डॉ. वसंत सिताराम शेकडे
९. डॉ. (श्रीमती) आरती प्रसाद
१०. श्री. महादेव बाबुराव जगताप
११. प्राचार्य (डॉ.) विजय भालचंद्र जोशी
११. श्री. संजय बा. शेटे

बाब १ : शारिरीक शिक्षण विभागातील शिक्षकांना एकमेकांविरोधात तसेच विद्यार्थ्यांना काही शिक्षकांविरोधात केलेल्या तक्रारीचे निवारण करण्याबाबत तसेच शिक्षकांच्या, विद्यार्थ्यांच्या तक्रारी आणि त्याअनुषंगाने विभागातील इतर समस्यांबाबत व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २५ नोव्हेंबर, २०१४ रोजी संपन्न झालेल्या सभेत दिलेल्या आश्वासनानुसार झालेली बैठक.

ठराव: शारिरीक शिक्षण विभागातील शिक्षकांनी एकमेकांविरोधात तसेच विद्यार्थ्यांना काही शिक्षकांविरोधात केलेल्या तक्रारीचे निवारण करण्याबाबत तसेच शिक्षकांच्या, विद्यार्थ्यांच्या तक्रारी आणि त्याअनुषंगाने विभागातील इतर समस्यांबाबत साधक-बाधक चर्चा झाली. विभागातील शिक्षक व विद्यार्थ्यांनी नुसत्याच तक्रारी न करता विद्यापीठ प्रशासनाची परवानगी न घेता न्यायालयात धाव घेतली आहे. यावर सन्माननीय सदस्यांनी या गोष्टीला हरकत घेऊन या गोष्टीला आपला विरोध दर्शवित सभागृहाच्या हे निदर्शनास आणून दिले की व्यवस्थापनाची परवानगी न घेता शिक्षक किंवा विद्यार्थी थेट न्यायालयात कसे काय जावू शकतात?

विभागातील शिक्षकांची पदे भरताना श्रीमती जसबीर कौर यांना अनुसुचित जातीसाठी उपलब्ध असलेल्या पदावर कसे काय नियुक्त केले? तसेच काही शिक्षकांनी काही प्रकरणाबाबत न्यायालयाची स्थगिती आणलेली आहे.

सन्माननिय सदस्यांनी शारिरीक शिक्षण विभागात इतक्या वर्षापासून (पाच वर्ष) तक्रारी येत असून त्यावर प्रशासनाने काहीच कसे केले नाही. त्यामुळे विभागावर कुणाचा अंकुश नसल्यामुळे तक्रारींच प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास आणले. तसेच या तक्रारींबाबत संबंधितांना कारणे दाखवा नोटीस देण्याबद्दल किंवा हा विभागच बंद करावा नाहितर विभागाचे विभाजन करुन काही शिक्षकांची अन्य विभागात बदली करावी असे सुचविले असता शारिरीक शिक्षण विभागाच्या तक्रारीबाबत सविस्तर चर्चेच्या अनुषंगाने तसेच सन्माननिय सदस्यांनी मांडलेले विचार ऐकून मा. कुलगरुंनी काही बाबतीत उपाय/सुचनां सुचविल्या व त्यांनी गेल्या पाच वर्षातील शारिरीक शिक्षण विभागाच्या तक्रारी नसून हा विभाग अस्तित्वात आला तेव्हापासूनच्या या तक्रारीं असल्याचे सांगितले.

जर विभागातील कुणालाही काही तक्रार असल्यास त्यांनी प्रथम तक्रार निवारण कक्षाकडे जायला (पाठपुरावा केला) पाहिजे. प्रशासनाने त्यांच्या विरोधात काही कारवाई केली नाही ही बाब सध्या बाजूला ठेवूया कारण विभागातील काही शिक्षक व विद्यार्थी कोर्टात गेल्यामुळे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. त्यामुळे आता निर्णय होऊ शकत नाही. आणि काही विषयात शिक्षकांनी जातीचा विषय असल्यामुळे atrocity सारखी प्रकरणे उद्भवू शकतात आणि यासाठी विद्यापीठाची परवानगीची आवश्यकता आहे असे कुठे लिहलेले नाही.

तसेच मा. कुलगुरुंनी विद्यार्थ्यांसोबत घेतलेल्या बैठकीत शिक्षकांच्या भांडणात विद्यार्थ्यांना नाहक गुंतविले जाते. आणि मुंबई विद्यापीठाची पत/नाव असल्यामुळे विद्यार्थी या विभागात प्रवेश घेत असतात असे निदर्शनास आणले.

असा ठराव करण्यात आला की, सन २०१५-२०१६ ह्या वर्षाकरिता नविन विद्यार्थ्यांना प्रवेश देणे बंद करावे आणि जुन्या विद्यार्थांची संख्या लक्षात घेवून त्याप्रमाणे शिक्षकांच्या वर्क लोडचा आढावा घेण्यात यावा आणि अतिरिक्त शिक्षकांची बदली जेथे शारिरीक शिक्षण विभाग आहे तेथे करावी.

वेळेअभावी सभा स्थगित करण्यात आली. उर्वरीत बाबी पुढील सभेत घेण्यात यावे असे ठरले.

मान्यतेसाठी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कुलगुरु | प्र-कुलगुरु | संचालक,<br>बी.सी.यु.डी. | कुलसचिव | स्थानापन्न उप-कुलसचिव<br>कार्यकारी प्राधिकरणे |